महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २७७ वा | दिनांक : ०४/०९/२०२५ | वार : गुरूवार

## हा शासन निर्णय नसून, केवळ एक माहिती पुस्तिका - विनोद पाटलांचा दावा



**छत्रपती संभाजीनगर :** मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनानंतर, महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन आरक्षणाचा लाभ देण्यासाठी एक शासन निर्णय जारी केला. मात्र, मराठा आरक्षण याचिकाकर्ते आणि कार्यकर्ते विनोद पाटील यांनी या निर्णयावर आक्षेप घेतला आहे. विनोद पाटील यांच्या मते, हा शासन निर्णय नसून, केवळ एक माहिती पुस्तिका आहे. त्यामुळे, या जीआरमुळे मराठा समाजाला कोणताही फायदा होणार नाही, असा दावाही त्यांनी केला आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना विनोद पाटील म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांना सरकारने जो कागद दिला आहे, त्याला जीआर म्हणता येणार नाही. हे नेमके काय आहे? एखाद्या गोष्टीची माहिती अशा पद्धतीने कारण करण्यात यावी, अशी माहिती या कागदामध्ये असल्याचे विनोद पाटील यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना विनोद पाटील म्हणाले, हा कागद कायदा नाही किंवा अध्यादेश नाही. यामध्ये फक्त ज्यांच्याकडे पुरावे आहेत, त्यांना जलद गतीने प्रमाणपत्र देण्याबाबत सांगितले आहे. मला अशी अपेक्षा होती की काहीतरी मोठा निर्णय लागेल, परंतु दुर्दैवाने कुठल्याही प्रकारचा निर्णय लागलेला नाही. विखे साहेबांनी स्वतः पुढे यावे आणि आम्हाला समजावून सांगावे की या निर्णयाचा फायदा आम्हाला कसा होईल. हा कागद फक्त माहिती पुस्तिका आहे. यामुळे एकाही व्यक्तीला नवीन प्रमाणपत्र मिळू शकत नाही.

मी ओबीसी नेत्यांचे वक्तव्य पाहतोय आणि त्यांना देखील सांगतो की कृपया तुम्ही कोर्टात जाऊ नका. कारण हा निर्णयच नाही. हा निर्णय नसल्यामुळे कोर्ट या प्रकरणी लक्ष देणार नाही. कुठलाही निर्णय झालेला नाही. हा निर्णय फक्त जुन्या पुराव्यांवर आधारित आहे. ज्यांच्याकडे नोंद नाही किंवा पुरावे नाहीत, अशा लोकांना याचा कोणताही लाभ होणार नाही, असा दावा त्यांनी केला. त्यामुळे यापुढे मी ताकदीने न्यायालयीन लढाई लढेन, असेही विनोद पाटील यांनी म्हटले आहे.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचे कौतुक करत असतानाच समाजाचा प्रश्न मार्गी लागलेला नसल्याचे विनोद पाटील यांनी म्हटले आहे. या कागदामुळे समाजाचा कोणताही फायदा होणार नाही. कारण यामध्ये कोणालाच नवीन प्रमाणपत्र देण्याबाबत उल्लेख नाही. खुल्या प्रवर्गात राहिलेल्या मराठा समाजासाठी आपण ताकदीने न्यायालयीन लढाई लढणार आहोत, असेही त्यांनी म्हटले आहे.

## मराठा आरक्षणाचा जीआर म्हणजे व्हायरस



**मुंबई :** राज्य सरकारने मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य करत मराठा आरक्षणाचा जीआर काढला. त्यानंतर मराठा आंदोलकांनी मुंबई सोडली. मनोज जरांगे यांनी गुलाल उधळत जल्लोष केला. त्यानंतर आता या जीआरवर अनेकांनी टीका करण्यास सुरुवात केली आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकला आहे. तसेच वकील गुणरत्न सदावर्ते यांनी देखील पत्रकार परिषद घेत हा जीआर म्हणजे व्हायरस असल्याची टीका केली आहे.

गुणरत्न सदावर्ते म्हणाले, मी सन्माननीय भुजबळ साहेबांचे स्वागत करतो, त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकला आहे. छगन भुजबळांनी संवैधानिक गांभीर्य दाखवले आहे. किती जातीवादी झालो आपण? विरोधातले आमदार, खासदार आणि सत्तेतील मराठा मंत्री, आमदार व खासदार सगळे जातीच्या आधारावर ठरवत असतील, त्यांना दुसऱ्या कोणाचे ऐकायचे देखील नसेल तर भारताचा संविधानच कशाला पाहिजे? असा सवाल गुणरत्न सदावर्ते यांनी केला आहे.

पुढे बोलताना गुणरत्न सदावर्ते म्हणाले, कुणबी कोण आहे, हे तरी लक्षात घ्या. कुणबीचा डिक्शनरी अर्थ हा शेतकरी असा आहे. मग ब्राह्मण माणूस जर शेती करत असेल तर त्या काळात शेतकऱ्याला कुणबी म्हटले जायचे, बौद्ध माणूस शेती करत असेल तर महार म्हणून शेतीशी संबंधित तो माणूस आहे. परंतु, आपण हे सगळे बदलून टाकायला निघालो आहोत. आपण काय करायला निघालात? संविधानाचे तीनतेरा वाजवण्याचे काही कारण नाही.

मुख्यमंत्री महोदय ब्राह्मण समाजाचे आहेत, घेरु नका. आम्हाला माहीत आहे शिंदे साहेब, सन्माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब आपण दरेगावला नेहमीच जात असता, जेव्हा आपल्या डोक्यावर ताण पडतो. परंतु, आपण दरेगावला जाऊन ओबीसींची वाट लागावी, असे आपल्याकडून कधीच अपेक्षित नाही आणि कधीच अपेक्षित राहणार नाही. मी एकनाथ शिंदे यांना आवाहन करतो, कालचा शासन निर्णय हा व्हायरस आहे, आजच्या कॅबिनेट बैठकीत हा शासन निर्णय आपण मागे घ्यावा, असे गुणरत्न सदावर्ते यांनी म्हटले आहे.

गुणरत्न सदावर्ते म्हणाले, सरकारला संभ्रम अवस्था निर्माण करायची, आमदार-खासदार मराठा समाजाचे आहेत, मराठवाड्यातले आहेत, ते चॉकलेट वाटण्यासारखे प्रमाणपत्र देतील. पण, मराठा बांधव मागासलेले नाहीत, वडारी दगड फोडतो, त्याला मागासलेपण म्हणतात. मंदिरातल्या चाव्या ब्राह्मणांकडे नाही तर मराठ्यांकडे आहेत. जरांगे यांना गावाकडे धाडण्यासाठी शासन निर्णयाचे चॉकलेट दिले

## जीआर निवडणूक डोळ्यासमोर ठेवून काढला; मराठा समाजाची फसवणूक?- रोहित पवार



**मुंबई :** मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने काढलेल्या जीआरनंतर ही राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. निवडणुका तोंडावर आल्यामुळेच हा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप करत, सरकारने मराठा आणि ओबीसी समाजांत जाणीवपूर्वक वाद निर्माण करून सत्तेची पोळी भाजल्याचे पवार म्हणाले.

रोहित पवार म्हणाले की, मागील वेळी लोकसभा निवडणुकीपूर्वी मराठा आंदोलकांची फसवणूक करण्यात आली होती, त्याचप्रमाणे आताच्या जीआरमध्ये-ही आश्वासनांची पूर्तता होणार नाही, अशी शंका त्यांनी व्यक्त केली. हा निर्णय केवळ राजकीय फायद्यासाठी घेतला असून, ही फसवणूकीची पुनरावृत्ती आहे का, असा सवालही रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.

आमदार रोहित पवार म्हणाले की, मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार राज्य सरकारने काल काढलेल्या #GR मुळे मराठा समाजाचा विजय झाला असेल तर तो पूर्णतः मनोज जरांगे पाटील आणि त्यांना साथ देणाऱ्या सामान्य मराठा समाजाचा आहे. याबाबत त्यांचं मनापासून अभिनंदन! पण यानिमित्ताने अनेक प्रश्न उपस्थित होतात. मंत्रिमंडळ उपसमिती आधीही होती आणि आजही आहे. या समितीत मराठा नेत्यांसह गिरीश महाजन साहेब तर काल व्यासपीठावर जयकुमार गोरे हे ओबीसी नेते सुद्धा होते, मग काल घेतलेला निर्णय सर्वमान्य होता तर हाच निर्णय लोकसभा निवडणुकीपूर्वी का घेतला नाही? दोन वर्षे मराठा आणि ओबीसी समाजात दरी निर्माण करण्यासाठी मुद्दामहून वाट पाहिली गेली का? या आंदोलनाचा इशारा तीन महिने आधी दिला असताना, तेंव्हाच सरकारने कार्यवाही का केली नाही? न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतरच मंत्रिमंडळ उपसमिती का सक्रीय झाली? मुंबईकरांची आणि आंदोलकांची गैरसोय झाली पाहिजे, ही सरकारचीच भूमिका होती का? कालच्या #GR बाबत तज्ज्ञांची मतं बघितली तर न्या. संदीप शिंदे समिती जे काम करत होती तेच काम जी आर मधून हैदराबाद गॅझेट या गोंडस नावाखाली होणार असल्याचं दिसून येतं.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०४ सप्टेंबर २०२५

# उमरगा जनता बँकेत गणरायाची महाआरती



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा जनता बँकेतील बुध्दीचे आराध्य दैवत श्री गणरायाची बुधवारी (दि.३) आरती बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील व तहसीलदार गोविंद येरमे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी बँकेचे व्हा. चेअरमन विरसंगप्पा आळंगे, संचालक विनय बदोले, अ‍ॅड. संजय बिराजदार, रफीक तांबोळी, भरत मारेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अमित भरडे, श्री विठ्ठलसाई कारखान्याचे संचालक राजीव हेबळे, दिलीप भालेराव, मल्लिनाथ दंडगे, माजी सभापती सचिन पाटील, मनिष माणिकवार, प्राचार्य श्रीराम पेठकर, अ‍ॅड. उदय वैद्य, शंकर पाटील, रविंद्र ढंगे, अनिल सगर, राहुल हेबळे, प्रा. शौकत पटेल, परमेश्वर टोपगे, महेश माशाळकर, चंद्रशेखर पवार, विक्रम मस्के, यशपाल कांबळे आदीसह शाखा-धिकारी, सभासद व कर्मचारी उपस्थित होते.

# तालुकास्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न



**कन्नड (प्रा. कृष्णा शिंदे) :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर व तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने तालुकास्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेचे आयोजन तालुका क्रीडा संकुल कन्नड येथे करण्यात आले होते. या स्पर्धेला तालुका क्रीडा संकुल समितीचे सदस्य प्रवीण शिंदे व तालुका क्रीडा संयोजक मुक्तानंद गोसावी यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेत एकूण १२ संघानी सहभाग नोंदवला. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशाल दांडेकर, राहुल दणके, वसीम शेख, अजित खांबट यांनी काम पाहिले. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे १४ वर्षे मुले प्रथम क्रमांक: देवगिरी इंग्लिश स्कूल , द्वितीय: मदरगंगा इंग्लिश स्कूल मुली प्रथम क्रमांक: देवगिरी इंग्लिश स्कूल, द्वितीय: सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय १७ वर्षे मुले प्रथम क्रमांक: मदरगंगा इंग्लिश स्कूल, द्वितीय: देवगिरी इंग्लिश स्कूल मुली प्रथम क्रमांक: देवगिरी इंग्लिश स्कूल, द्वितीय: सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय १९ वर्षे मुली प्रथम क्रमांक : राधाबाई शिंदे माध्यमिक विद्यालय हस्ता द्वितीय: सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय कन्नड पंच म्हणुन राहुल दणके, विशाल दांडेकर, एजाज शहा, वसीम शेख, रविकुमार सोनकांबळे, अजित खांबट यांनी काम केले.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

# लक्ष्मण हाकेंनी 'मौन आंदोलन' १२ महिने तेरा काळ करावे : अंजली दमानियांचा टोला



**पुणे** मनोज जरांगे पाटलांनी मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण करत महायुती सरकारची चांगलीच कोंडी केली होती. ५ दिवसांच्या उपोषणानंतर अखेर देवेंद्र फडणवीस सरकारने मराठा बांधवांच्या मागण्या मान्य केल्या व आरक्षणासंदर्भातील जीआर काढला. त्यानंतर मनोज जरांगे यांनी त्यांचे उपोषण मागे घेतले. त्यावर लक्ष्मण हाके यांनी टीका केली आहे. बेकायदा मागणीसाठी हे आंदोलन होते तसेच मुख्यमंत्री हतबल असल्याचे देखील हाके यांनी म्हटले आहे. तसेच आता त्यांनी मौन आंदोलन देखील सुरू केले आहे. यावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी ट्विट करत टोला लगावला आहे.

अंजली दमानिया यांनी लक्ष्मण हाके यांच्यावर टीका करताना एक ट्विट केले आहे. त्या म्हणाल्या, लक्ष्मण हाकेंचे 'मौन आंदोलन' अतिशय योग्य आहे. त्यांनी हे १२ महीने तेरा काळ करावे, असे म्हणत टोला लगावला आहे. राज्य सरकारने मराठा आरक्षणाच्या संदर्भात काढलेल्या शासन निर्णयाच्या विरोधात ओबीसी आरक्षण बचाव समितीचे नेते लक्ष्मण हाके यांनी शासन निर्णय फाडत निषेध व्यक्त केला आहे.

पुणे येथील महात्मा फुले वाड्यात लक्ष्मण हाके यांच्यासह इतर ओबीसी नेते व कार्यकर्त्यांनी आंदोलन सुरू केले आहे. यावेळी त्यांनी मौन आंदोलन करत अनोख्या पद्धतीने शासनाच्या निर्णयाचा निषेध केला आहे. राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाविरोधात ओबीसी समाज राज्यभर निषेध व्यक्त करणार आहे. तसेच ओबीसी आरक्षण बचाव समितीच्या पुढील लढ्याची दिशा लक्ष्मण हाके यांनी स्पष्ट केली आहे.

मनोज जरांगे पाटील हे समाजाचे बळ दाखवून शासनाला कसलेही शासन निर्णय काढण्यास भाग पाडत आहेत. शासन देखील दबावापोटी जरांगे यांच्या मागण्या मान्य करून शासन निर्णय काढत आहे. शासनाचे कृत्य म्हणजे ओबीसी आरक्षणावर घाला आहे, असे सांगत मराठा आरक्षणासाठीचा राज्य सरकारचा जीआर हाके यांनी फाडला.

ओबीसी आरक्षण विरोधी आंदोलनाला अजित पवारांचे आमदार विजयसिंह पंडित यांनी पाठिंबा दिला. कोणी गाड्या पुरवल्या, कोणती माणसे होती, कोणी पत्रकार परिषदा घेतल्या आणि या सगळ्या मागे पवार फॅमिली आहे. रोहित पवारांचे आयटी सेल हे मनोज जरांगेचे आंदोलन चालवत होता हे महाराष्ट्रातल्या ओबीसींना माहिती आहे. कालपासून मी बोलत आहे की हा जीआर बेकायदा का आहे, त्याचे कारण असे आहे की शासनाच्या आदेशात असे लिहिले आहे की, मराठा समाजास जात प्रमाणपत्र प्रक्रियेत सुलभता यावी याकरता शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे. म्हणजे या जीआरचा उद्देश मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याचा हा आहे, असे लक्ष्मण हाके म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०४ सप्टेंबर २०२५


## पवार ईस्ट इंडिया कंपनीने महाराष्ट्रातील ओबीसी आरक्षण संपवले - लक्ष्मण हाके



**पुणे :** मनोज जरांगे यांच्या मागण्या देवेंद्र फडणवीस सरकारने मान्य केल्या असून जरांगे पाटलांनी त्यांचे उपोषण मागे घेतले आहे. तसेच मराठा आंदोलक देखील मुंबईतून माघारी फिरत आहेत. अशात ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी आता हल्लाबोल सुरू केला असून पवार कुटुंबावर निशाणा साधला आहे.

पत्रकार परिषद घेत लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांच्यासह पवार कुटुंबावर टीकेची झोड उठवली आहे. ते म्हणाले, शरद पवार एकीकडे मंडल यात्रा काढतात आणि दुसरीकडे मनोज जरांगेंच्या बेकायदा मागण्याला पाठिंबा देतात. या पवार फॅमिलीने, या पवार ईस्ट इंडिया कंपनीने महाराष्ट्रातील ओबीसी समाजाचे आरक्षण संपवले आहे आणि त्यामुळे त्याला मुख्यमंत्री महोदय बळी पडलेले आहेत.

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हतबल होते. एकीकडे न्यायालयाने कठोर ताशेरे ओढले इथल्या शासनावर आणि एक वेळ दिली की यांना लवकर मुंबईच्या बाहेर काढा. म्हणजे एकीकडे न्यायालयाच्या निर्णयासमोर हतबल होते आणि दुसरीकडे यांना मुंबईच्या बाहेर कसे काढायचे यासाठी हतबल होते. पण हे जे आंदोलन उभे केले आणि बेकायदा मागण्यांना पाठिंबा द्यायचे काम केले शरद पवारांनी, सुप्रिया सुळेंनी आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवारांचे खासदार बजरंग सोनवणे यांनी.

ओबीसी आरक्षण विरोधी आंदोलनाला अजित पवारांचे आमदार विजयसिंह पंडित यांनी पाठिंबा दिला. कोणी गाड्या पुरवल्या, कोणती माणसे होती, कोणी पत्रकार परिषदा घेतल्या आणि या सगळ्या मागे पवार फॅमिली आहे. रोहित पवारांचे आयटी सेल हे मनोज जरांगेंचे आंदोलन चालवत होता हे महाराष्ट्रातल्या ओबीसींना माहिती आहे. कालपासून मी बोलत आहे की हा जीआर बेकायदा का आहे, त्याचे कारण असे आहे की शासनाच्या आदेशात असे लिहिले आहे की, मराठा समाजास जात प्रमाणपत्र प्रक्रियेत सुलभता यावी याकरता शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे. म्हणजे या जीआरचा उद्देश मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याचा हा आहे, असे लक्ष्मण हाके म्हणाले.

लक्ष्मण हाके म्हणाले, मनोज जरांगे पाटलांना ज्या ज्या नेत्यांनी मदत केली, त्या सगळ्या नेत्यांवर बहिष्कार टाकणार. ओबीसींच्या कार्यकर्त्यांना सांगून त्यांची नावे निश्चित करणार आणि मनोज जरांगेंना मदत करणाऱ्या नेत्यांवर बहिष्कार टाकायला सांगणार. ज्या बारामतीमधून मनोज जरांगे पुढे गेलेत, त्याच बारामतीत आम्ही जाऊन आंदोलन करणार. तसेच न्यायालयीन लढा आणि रस्त्यावरची लढाई लढण्यासाठी आता ओबीसी बांधवांनी एकत्र यावे, असे आवाहनही लक्ष्मण हाके यांनी केले आहे.

मराठा समाजासाठी काढलेल्या जीआरबाबत ओबीसी समाजात नाराजी असल्याचे बोलले जात आहे. सोमवारी ओबीसी समाजाच्या नेत्यांकडून कोर्टात जीआरबाबत हरकत घेणारी याचिका दाखल करण्यात येणार आहे. जीआर काढण्याचा अधिकार मराठा आरक्षण उपसमितीला नाही शिवाय मागासवर्गीय ठरवण्याचा अधिकार मागासवर्गीय आयोगाला असताना राज्य सरकारने परस्पर निर्णय घेतलाच कसा? एकीकडे ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लावणार नाही, म्हणता आणि दुसरीकडे मराठा समाजाला बॅकडोअर एंट्री कशी काय देता? असा सवाल लक्ष्मण हाके यांनी उपस्थित केला आहे.

मराठा आरक्षणासंदर्भात सरकारने काढलेल्या जीआरवर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा निर्णय ओबीसी आरक्षण उद्ध्वस्त करणारा आणि संविधान विरोधी असल्याचे त्यांनी म्हटले. याच पार्श्वभूमीवर हाके यांनी ५ सप्टेंबरपासून बारामतीत ओबीसींच्या आंदोलनाची घोषणा केली आहे.

## ऑनलाइन टास्कच्या नावाखाली फसवणूक




**पुणे :** घरातून ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी असल्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेत दोघांची आठ लाख रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी खडकी आणि मुंढवा पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले.

खडकी परिसरातील एका तरुणीची ऑनलाइन टास्कच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी चार लाख 16 हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत तरुणीने खडकी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुणीच्या मोबाइल क्रमांकावर चोरट्यांनी संदेश पाठविला होता. ऑनलाइन पद्धतीने घरातून कामाची संधी असे आमिष चोरट्यांनी दाखविले होते. सुरुवातीला चोरट्यांनी तरणीला ऑनलाइन पद्धतीने काम दिले. हे काम पूर्ण केल्यानंतर तरुणीला परताव्यापोटी काही रक्कम दिली. परतावा मिळाल्याने तरुणीचा विश्वास बसला. त्यानंतर चोरट्यांनी तिला ऑनलाइन टास्कमध्ये आणखी रक्कम गुंतविण्यास सांगितले. तरुणीने 26 ते 31 जुलै या कालवधीत चोरट्यांच्या खात्यात चार लाख 16 हजार रुपये जमा केले. रक्कम जमा केल्यानंतर चोरट्यांनी मोबाइल क्रमांक बंद केले. तिने चोरट्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, चोरट्यांचे मोबाइल क्रमांक बंद असल्याचे उघडकीस आल्यानंतर तरुणीने पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विक्रमसिंह कदम तपास करत आहेत.

अशाच पद्धतीने सायबर चोरट्यांनी एका तरुणाची तीन लाख 99 हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत तरुणाने मुंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब निकम करत आहेत.

## सोनेरी घडे

सूर्य नवा घेऊनी आला, पहा सोनेरी घडे
घननिळ्या आकाशाखाली, फुलली हिरवी झाडे
शुभ्र पांढऱ्या डोंगररानी
मेघ आषाढी गर्जत आले
काळे पाषाण नव्याने
कुंभ अमृताचे प्याले

रामप्रहरी नदी किनारी, पावसाचे सडे
सूर्य नवा घेऊनी आला, पहा सोनेरी घडे

रानफुलांच्या गंधात मिसळले
दरी खोऱ्यातील वारे
सृष्टीच्या रंगांत न्हाले
पशु अन् पाखरे

हिरव्या रानी शेतशिवारी, रानफुलांचे घडे
सूर्य नवा घेऊनी आला, पहा सोनेरी घडे

पावसाच्या थेंबात न्हाले
पाखरांचे मंजूळ गाणे
धुक्याच्या गर्दीत हरवले
वनराईचे हिरवे पाने

शीळ घालता वाऱ्याने हसू लागले पानझडे
सूर्य नवा घेऊनी आला, पहा सोनेरी घडे

**ज्ञानेश्वर गायके कन्नड**
**मो.9403384889**







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०४ सप्टेंबर २०२५


## मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात अडचणी येणार नाहीत - एकनाथ शिंदे



**मुंबई :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत उपोषण सुरू केले होते. ५ दिवसांच्या उपोषणानंतर अखेर राज्य सरकारने जरांगेंच्या मागण्या मान्य केल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनाने जीआर देखील काढला आहे. परंतु, या जीआरला ओबीसी नेत्यांनी विरोध केला असल्याचे दिसत आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी देखील या जीआरच्या निषेधार्थ आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकला होता. या सगळ्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले, हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर आपल्या सरकारने काढला आहे. याबद्दल सविस्तर मी बोललो आहे तसेच मुख्यमंत्री सुद्धा बोलले आहेत. यामध्ये जो निर्णय आम्ही घेतला आहे तो कायद्याच्या चौकटीत बसवून घेतला आहे. त्यामुळे जी काही पद्धत आहे मराठा समाजातल्या कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात जी प्रक्रिया आहे ती अधिक सोपी करणे सुलभ करणे याचा उल्लेख जीआरमध्ये स्पष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे मला असे वाटते की त्याची अंमलबजावणी करण्यात कुठलीही अडचण येणार नाही आणि कुणबी प्रमाणपत्र मराठा समाजाला मिळेल.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, हे सगळे करत असताना ओबीसी समाजाचे कुठलेही नुकसान होणार नाही, अशी भूमिका सरकारची सुरुवातीपासून आहे. छगन भुजबळ यांच्याशी आम्ही बोलू, मुख्यमंत्री देखील बोलतील आणि जो काही निर्णय घेण्यात आला आहे, त्याची जी काही वस्तुस्थिती आहे त्यांना समजाऊन सांगू. मला वाटते आपण जो काही निर्णय घेतलेला आहे त्याची माहिती आणि वस्तुस्थिती समजून घेतल्यानंतर भुजबळ साहेबांची नाराजी दूर होईल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

छगन भुजबळ हे मराठा आरक्षणाच्या जीआरमुळे नाराज झाल्याने त्यांनी आजच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकल्याची चर्चा आहे. मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी झालेल्या पक्षाच्या बैठकीला छगन भुजबळ उपस्थित होते. मात्र कॅबिनेट बैठकीला हजर नसल्याचे चर्चांना उधाण आले आहे. त्यांनी याबाबत बोलण्यास नकार दिला. मात्र मराठा आरक्षणाच्या जीआरला त्यांचा विरोध असून ते त्याविरोधात कोर्टात जाणार आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

तसेच मला वाटत आहे की काही लोक म्हणत होते की हरकती मागवायला हव्या होत्या.काही लोक म्हणतात की ते यांना अधिकार आहे का? आता पाहू ते सगळ आता आम्ही विचार करतो. असा निर्णय होईल अशी आम्हाला काय कुणालाच अपेक्षा नव्हती, अशी प्रतिक्रिया भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.

## शिंदे गटाच्या कार्यकर्त्याची कारखाली चिरडून हत्या

**ठाणे :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेच्या एका कार्यकर्त्याची ठाण्यातील वागळे इस्टेट येथील आयटी सर्कल येथे कारखाली चिरडू हत्या करण्यात आल्याची भयंकर घटना मंगळवारी रात्री उशिरा घडली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, यामुळे जनतेत दहशत पसरली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, विठ्ठल गायकर असे मृत व्यक्तीचे नाव आहे. तो शिवसेनेचा स्थानिक कार्यकर्ता होता. त्यांची काल रात्री ९ च्या सुमारास संतोष पवार नामक आरोपीने कारखाली चिरडून निर्घृण हत्या केली. घटनेनंतर आरोपी संतोष पवार कारसह फरार झाला. पण श्रीनगर पोलिसांनी तत्काळ तपासाची सूत्रे हाती घेत आरोपीची कार जप्त केली. पोलिसांनी आरोपीच्या एका सहकाऱ्यालाही अटक केली आहे. श्रीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गुलजारीलाल फडतरे यांनी या घटनेविषयी सांगितले की, आरोपीच्या शोधासाठी ३ विशेष पथके स्थापन करण्यात आली आहे.

दुसरीकडे, घटनेचे एक सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियात व्हायरल झाले आहे. त्यात गुंड संतोष पवार हा विठ्ठल गायकर यांना कारखाली चिरडून ठार मारताना दिसत आहे. प्रथम तो गायकर यांना कारने धडक देतो. त्यानंतर ते खाली पडल्यानंतर कार त्यांच्या छाती व डोक्यावर घालतो. आरोपी संतोष पवारवर यापूर्वीसुद्धा अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. हे हत्याकांड पूर्ववैमनस्यातून घडल्याचेही सांगण्यात येत आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे या घटनेनंतर ठाण्यातील गुन्हेगारी स्वरुप व त्यातील नवनवीन पॅटर्नकडे लक्ष वेधले गेले आहे. गुंड आता पूर्वीप्रमाणे शस्त्राने नव्हे तर गाडीखाली चिरडून ठार मारताना दिसून येत आहेत. पोलिसांपुढे आरोपीच्या मुसक्या आवळण्याचे मोठे आव्हान आहे.

दुसरीकडे, पुणे पोलिसांनी वनराज आंदेकरच्या हत्येचा बदला घेण्याचा एक प्रयत्न उधळवून लावला आहे. माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची गतवर्षी हत्या करण्यात आली होती. त्यांच्या हत्येला १ वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने विरोधी टोळीने बदला घेण्याचा कट आखला होता. त्यानुसार, वनराज आंदेकर यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सोमनाथ गायकवाडच्या मुलावर कात्रज भागात रविवारी मध्यरात्री हल्ला करण्याची योजना होती. पण तत्पूर्वीच या कटात सहभागी असणाऱ्या एका आरोपीला अटक करण्यात आली. यामुळे हा कट उधळला गेला. या प्रकरणी समर्थ नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गुगलवर कस्टमर केअर नंबर शोधू नका : सायबर फसवणुकीचे बळी होऊ शकता,

गुगल हे जगातील सर्वात मोठे सर्च इंजिन आहे, जिथे जवळजवळ प्रत्येक प्रश्नाची उत्तरे मिळतात. अनेकदा लोक बँक, कंपनी किंवा विभागाशी संबंधित माहितीसाठी गुगलवर कस्टमर केअर नंबर शोधतात, परंतु या प्रक्रियेत फसवणूक किंवा बनावट नंबर मिळण्याचा धोका असतो.

खरंतर गुगलवर उपलब्ध असलेला प्रत्येक नंबर बरोबर किंवा अधिकृत असायला हवा असं नाही. बऱ्याचदा सायबर गुन्हेगार गुगलवर बनावट ग्राहक क्रमांक टाकून लोकांना फसवतात आणि त्यांची बँक खाती रिकामी करतात. त्यामुळे कोणत्याही कंपनीचा कस्टमर केअर नंबर शोधताना खूप सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

तर, आज 'सायबर साक्षरता' या कॉलममध्ये, आपण ग्राहक सेवेच्या नावाखाली घोटाळे कसे होतात याबद्दल बोलू. तसेच, आपण हे जाणून घेऊ की-

•बनावट कस्टमर केअर नंबर कसा ओळखायचा?

•योग्य कस्टमर केअर नंबर कुठून मिळेल?

तज्ज्ञ:

राजेश दंडोटिया, अतिरिक्त डीसीपी, गुन्हे शाखा, इंदूर

राहुल मिश्रा, सायबर सुरक्षा सल्लागार, उत्तर प्रदेश पोलिस

प्रश्न- गुगलवर कस्टमर केअर नंबर का शोधू नये?

उत्तर- गुगल त्यांच्या अल्गोरिथम, एसइओ (सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन) आणि जाहिरातींवर आधारित रँक केलेले ग्राहक सेवा क्रमांक वर दाखवते. हा देखील योग्य आणि अधिकृत ग्राहक सेवा क्रमांक असू शकतो, परंतु सायबर गुन्हेगार बनावट वेबसाइट्स आणि सशुल्क जाहिरातींद्वारे बनावट क्रमांक वर दाखवू शकतात.

प्रश्न- बनावट ग्राहक सेवा क्रमांकांद्वारे घोटाळेबाज लोकांची फसवणूक कशी करतात?

उत्तर- जेव्हा एखादा वापरकर्ता कोणत्याही तक्रारीसाठी किंवा सेवेशी संबंधित माहितीसाठी गुगलवर दिलेल्या कस्टमर केअर नंबरवर कॉल करतो, तेव्हा सायबर गुन्हेगार त्याला वेगवेगळ्या प्रकारे फसवण्याचा प्रयत्न करतात. हे या उदाहरणांवरून समजू शकते.

•बनावट ग्राहक सेवा प्रतिनिधींशी संपर्क साधला असता, ते खऱ्या कंपनीसारख्या दिसणाऱ्या बनावट वेबसाइट किंवा ॲप्सच्या लिंक्स पाठवतात. यामध्ये लॉग इन करून, तुमचे लॉगिन क्रेडेन्शियल्स स्कॅमर्सकडे जातात.

•सायबर गुन्हेगार बँक अधिकारी असल्याचे भासवून वापरकर्त्यांच्या समस्या ऐकतात. यानंतर, ते मदतीच्या नावाखाली बँकिंग तपशील मागतात.

•बनावट कस्टमर केअर एजंट तुम्हाला कोणतेही ॲप, मोबाईल, लॅपटॉप किंवा इंटरनेट समस्या सोडवण्याचे आमिष दाखवतात. त्यानंतर, ते तुम्हाला रिमोट ॲक्सेस ॲप (एनीडेस्क, टीमव्ह्यूअर) डाउनलोड करायला लावून डिव्हाइस हॅक करतात.

•स्कॅमर कॉल करणाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्यासाठी दबाव आणतात, ज्यामुळे लोक त्यांची संवेदनशील माहिती घाईघाईने शेअर करतात.

प्रश्न: गुगलचा बनावट कस्टमर केअर नंबर कसा ओळखायचा?

उत्तर- खरे ग्राहक एजंट कधीही तुमची संवेदनशील माहिती विचारत नाहीत. जर कोणी खालील ग्राफिकमध्ये दिलेली माहिती विचारली तर समजून घ्या की तो एक फसवणुकीचा कॉल आहे.


